# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०३/२०२५ (गुरूवार) दुपार


---

### सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणारे अजुन २ आरोपी निष्पन्न
### स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १८/०३/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्यातील सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आरोपी विरूध्द ५ गुन्हे दाखल असुन त्यापैकी पोलीस स्टेशन कन्हान , काटोल येथील गुन्हयामध्ये तांत्रिक पध्दीतीने तपास करून स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी अजुन **दोन आरोपी निष्पन्न** केले आहे.

पोलीस स्टेशन कन्हान येथे सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणारा आरोपी नामे १.अनस शेख वल्द जिब्राईल शेख ,वय २१ वर्षे रा. शिवाजी नगर, कन्हान २. अरशीद शेख वल्द गौस शेख , वय २१ वर्षे,रा शिवाजी नगर, कन्हान ३. विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीया तेढ निर्माण होईल अशा इन्स्टाग्राम वर औरंगजेब बाबत पोस्ट टाकल्याने पोलीस स्टेशन कन्हान येथे नमुद आरोपीतांविरूध्द कलम २९९,१९६,३५३(२),३(५),भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद झाला आहे. **निष्पन्न आरोपी नामे फहीम शमीन खान रा. नागपुर याचा सुन्नी युथ फोर्स ऑफिसियल हा इन्स्टाग्राम वर गृप असुन सदर गुन्हयातील आरोपी क्र. २. अरशीद शेख वल्द गौस शेख , वय २१ वर्षे,रा शिवाजी नगर, कन्हान हा सदर गृपचा सदस्य असुन त्याने सदर गृप वरून औरंगजेब बाबत वादग्रस्त पोस्ट स्वत:च्या इन्स्टाग्राम ची स्टोरी ठेवल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. नामे फहीम शमीन खान रा. नागपुर हा नागपुर दंगलीमधील मुख्य सुत्रधार असुन त्याला नागपुर शहर पोलीसांनी अटक केली आहे.**

पोलीस स्टेशन काटोल:— सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणारा आरोपी नामे १. आरोपी रिहान युनुस शेख वय २२ वर्ष रा पेठबुधवार काटोल याने धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीया तेढ निर्माण होईल अशा सोशल

मिडीयावर औरंगजेब बाबत पोस्ट टाकल्याने पोलीस स्टेशन काटोल येथे नमुद आरोपीविरूध्द कलम,१९६, २९९, ३५३(२).भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद झाला आहे. **सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपी नामे हाफिज उर्फ मोनु शकिल शहा रा यशोधरा नगर याच्या bhanjesahab2626 या इन्स्टाग्राम आयडी वरून काटोल येथील गुन्हयातील आरोपी रिहान युनुस शेख याने औरंगजेब बाबत वादग्रस्त पोस्ट स्वत:चे इन्स्टाग्राम स्टोरी ठेवल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.सदर आरोपीला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.**

## संघटीतरित्या अवैध देशीदारूची वाहतुक व विक्री करणाऱ्या टोळीतील आरोपींना अटक न्यायालयाने दिली पोलीस कोठडी

कळमेश्वर तालुक्यातील विविध गांवामध्ये अवैध रित्या देशी दारू ची विक्री करण्याकरिता धापेवाडा येथील डोंगरे यांचे देशीदारूचे दुकानातुन देशी दारूच्या पेटया खरेदी करून वाहतुक करून घेवुन जाणारा ब्राम्हणी कळमेश्वर येथील युनुस शेख नावाचा ईसम हा त्याचे ताब्यातील पांढऱ्या रंगाचे अल्टोकार मध्ये अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करून धापेवाडा ते घोराड रोडने घेवुन जात आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळताच कळमेश्वर पोलीस तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर येथील अंमलदार यांनी धापेवाडा ते घोराड रोडवर डॉ. पोतदार यांचे शेताजवळ सापळा रचला व एका पांढऱ्या रंगाचे अल्टो कार क्र. एम.एच. ४० सी.ए. ६९९५ हिला थांबवुन तिची पाहणी केली असता त्यामध्ये १८० मिली व ९० मिलीच्या एकुण ८ देशी दारूचे सिलबंद बॉक्स दिसुन आल्याने तसेच वाहन चालका जवळ दारूबाबत कोणताही परवाना नसल्याने वाहन चालक नामे युनुस उस्मान शेख रा. ब्राम्हणी याचे कडुन पोलीसांनी २७,०२० रू. ची देशी दारू तसेच एक अल्टो कार किंमती २,००,००० रू. **असा एकुण २,२७,०२०** रू. चा मुद्देमाल जप्त केला. सदरची दारू ही त्याने धापेवाडा येथुन डोंगरे यांचे देशी दारूचे दुकानातुन आणली असुन अवैधरित्या देशी दारूची विक्री करणारे १) सुधाकर सोरते २) महीला आरोपी ३) संदीप मौजे ४) प्रकाश जौजा दोन्ही रा.उपरवाही ५) गुंडेराव डाखरे रा. सेलु ६) मनोज तागडे रा. घोगली. ७) मनोहर सावरकर ७) महीला आरोपी दोन्ही रा. ब्राम्हणी यांना नेवुन देत असल्याचे सांगितल्याने पोलीसांनी देशीदारू दुकानाचे मालक राजेश डोंगरे व अवैध रित्या विनापरवाना वाहतुक करणारा युनुस शेख याचे सह अवैध रित्या देशी दारूची विक्री करणारे वरील सर्व आठही

जणांविरूध्द कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे अपराध क्र. २४७/२०२५ कलम ६५(अ), ६५(ई), ८२ मदाका सह कलम ३(५) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. वरील सर्व आरोपी हे संघटीतरित्या स्वत:चे आर्थिक फायदयासाठी अवैधरित्या देशीदारूची विक्री करीत असल्याचे पोलीसांचे तपासात निष्पन्न झाल्याने भारतीय न्याय संहितेची कलम ११२ अन्वये वाढ करून देशी दारू दुकानाचे मालक राजेश डोंगरे व वाहतुक करणारा युनुस शेख यांना अटक करून प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.

**नागपुर जिल्हया मध्ये संघटीतरित्या अवैध दारू विक्री करणाऱ्यावर प्रथमच अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली असुन दारूच्या गुन्हयामध्ये आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाल्याचीही प्रथमच घटना आहे.वरील सर्व आरोपी हे सन २०२१ चे पुर्वी पासुन अवैध दारू विक्रीच्या व्यवसायात असल्याने त्यांनी या व्यवसायातुन किती व कोणती संपत्ती जमवीली आहे याचा सुध्दा तपास पोलीस करीत आहेत.**


भिंगरी
देशी दारु
केएसके डिस्टिलरी
,DhapewadaKh,India
21.2982373 , 78.9053326
19-03-2025 10:18:05 AM


MH40CA6995
,DhapewadaKh,India
21.2982464 , 78.9052946
19-03-2025 10:17:25 AM


,DhapewadaKh,India
21.2982602 , 78.9053289
19-03-2025 10:18:30 AM